**MHKO110005552024**

**नियमित दिवाणी दावा क्र. ४७ / २०२४.**
(CNR No.MHKO110005552024)

## निशाणी क्र. १९ खालील आदेश

०१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.६ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये त्यांच्या कैफियतीमध्ये दुरुस्ती करण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी यांचे अर्जातील कथन की, वादीने सदरचा दावा त्यांच्याविरूद्ध दावा मिळकतीच्या वाटपासाठी दाखल केला आहे. त्यानुसार प्रतिवादी क्र.६ यांनी मुळ दाव्यास व निशाणी क्र.०५ च्या अर्जास निशाणी क्र.१६ वर कैफियत दाखल केली आहे. मात्र सदरची कैफियत दाखल केल्यानंतर त्यांना काही कागदपत्रे उपलब्ध झाल्यामुळे त्यांना खालीलप्रमाणे त्यांच्या कैफियत मध्ये दुरुस्ती करावयाची आहे.

अ. त्यांच्यासमोर वाटणीचा मुळ दस्त नसल्यामुळे त्यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये केवळ सन १९८७-८८ साल असा उल्लेख केला आहे. सदरचा वाटणीचा दस्त त्यांना नंतर उपलब्ध झाल्यामुळे त्यांना सदर सन १९८७-८८ या उल्लेखाएवजी दिनांक ०८/०३/१९८८ रोजीचा दस्त अशी दुरुस्ती करावयाची आहे.

ब. दाव्याच्या टायटलच्या खाली " यातील प्रतिवादी क्र.६ तर्फे वादीचे मूळ ” हा मजकूर नव्याने घालण्याचा आहे.

क. कलम १५ मधील ओळ क्र.०७ च्या शेवटी " १९८७-८८ या अंकास काट मारून त्याऐवजी ता. ०८/०३/१९८८ रोजी” असा मजकूर नमूद करण्याचा आहे.

ड. कलम १७ मध्ये ओळ क्र.५ च्या शेवटी "तोंडी” हा शब्दास काट मारण्यास व ओळ क्र.६ मध्ये वाटप "१९८७-८८” या अंकास काट मारून केवळ १९८८ अशी दुरुस्ती करण्याची आहे.

इ. कलम २१ मध्ये ओळ क्र.१ मध्ये वाद मिळकतीचे वाटप "१९८७-८८” साली झलेनुसार ते १/३ हिश्शात स्वतंत्र वहिवाट करत आहेत असे म्हंटले आहे. त्या मजकूरापैकी "१९८७” हा अंक अनावश्यक वाटत असल्यामुळे तो कमी करण्याचा आहे.

ई. वादी मिळकतीचे वाटप हे ता. ०८/०३/१९८८ रोजी झाले आहे. हे निश्चितपणे प्रतिवादी सांगत असलेने त्यास अनुसरुन कैफियतमध्ये आवश्यक वाटले तेथे तेथे दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी.

०३. प्रतिवादीचे पुढील कथन की, वादी सुचवत असलेली दुरुस्ती ही फॉर्मल स्वरूपाची आहे. सदर दुरुस्ती अर्ज मंजूर झालेस वादीचे काहीही नुकसान होणार नाही. परंतु याउलट प्रतिवादीचे अपरिमित व कायमस्वरूपी नुकसान होणार आहे. प्रतिवादीने मागितलेली दुरुस्ती ही तांत्रिक स्वरूपाची असलेने सदरची दुरुस्ती मंजूर होणे अत्यंत निकडीचे आहे. सबब वादींनी प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

०४. वादी यांनी प्रस्तुत अर्जावरच त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या कथनांनुसार प्रस्तुतचा अर्ज हा केवळ दाव्यास विलंब करण्यासाठी दाखल केलेला आहे. तसेच, प्रतिवादी यांनी मागणी केलेले अर्जातील कलम ०६ हे नामंजूर करण्यात येवून प्रस्तुतचा अर्ज जास्तीत जास्त दंडावर मंजूर करण्याची विनंती वादी यांनी केली आहे.

०५. प्रस्तुत अर्ज व त्यावर वादींनी दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

०६. पुढील विवेचन करण्यापूर्वी या ठिकाणी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम ६ नियम १७ मधील खाली नमूद कायदेशीर तरतूद पाहणे उचित ठरेल.

**१७. वादकथनातील सुधारणा** -

न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोपैकी कोणत्याही पक्षकारांस, त्याच्या वादकथनास, न्याय्य असेल अशा रीतीने व अशा अटींवर फेरबदल करण्याची किंवा सुधारणा करण्याची मुभा देण्यात येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व सुधारणा केल्या पाहिजेत.

परंतु न्यायचौकशी सुरू झाल्यानंतर, पक्षकाराने योग्य ती खबरदारी घेवुन सुद्धा न्यायचौकशी सुरू होण्यापूर्वी ती बाब पुढे आणता आली नाही याबाबत न्यायालयाचे समाधान झालेले असल्याखेरीज सुधारणेसाठीचा अर्ज अनुज्ञेय असणार नाही.

०७. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा वादींनी दावा मिळकतींच्या वाटपासाठी दाखल केलेला आहे. दावा दाखल केल्यानंतर, प्रतिवादी क्र.६ यांनी त्यांची कैफियत निशाणी क्र.१६ वर दाखल केली आहे. मात्र त्यानंतर

त्यांना उपलब्ध झालेल्या कागदपत्रांवरून त्यांना त्यांच्या कैफियत मध्ये दुरुस्ती करावयाची आहे.

०८. प्रस्तुतचा दावा वादींनी दावा मिळकतींच्या वाटपासाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे दावा गुणदोषांवर निकाली करण्यासाठी दावा मिळकतीची व दाव्याबाबतची सर्व परिस्थिती अभिलेखावर येणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीमध्ये सदरचा अर्ज मंजूर करून प्रतिवादीयांना त्यांच्या कैफियतमध्ये सुधारणा करण्यास मंजुरी देणे न्यायोचित होईल. तसेच, वादीयांना प्रतिवादीच्या कैफियतमध्ये झालेल्या सुधारणेनुसार त्या अनुषंगाने त्यांचा जादा पुरावा देण्याची मुबलक संधी आहे. तसेच, दाव्याचा गुणदोषांवर अंतिम न्यायनिवाडा करण्याकामी प्रस्तावित सुधारणा ही क्रमप्राप्त आहे. वरील सर्व गोष्टींचा विचार करता, मी खालील आदेश पारित करत आहे.

## **<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी क्र.६ यांचा **निशाणी क्र.१९** वरील अर्ज, अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.६ यांनी प्रस्तुत आदेशाचे तारखेपासून १४ दिवसांच्या आत अर्जात नमूद केल्यानुसार दुरुस्ती कलम "ई" वगळता दुरुस्ती कलम "अ" ते "इ" प्रमाणे त्यांच्या कैफियतमध्ये दुरुस्ती करून, दुरुस्त प्रत अभिलेखावर सादर करावी.

३. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by LYAKATALI MUBARAK PATHAN
Date: 2024.05.03 17:39:47 +0530

**(एल. एम. पठाण)**

दिनांक. ०३/०५/२०२४. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पेठ वडगांव